D:/Regular-17/roshan new shelar/Circular

# University of Mumbai

**No. Aff./ICC/ (2018-19)/06/ of 2018**

## परिपत्रक:

विषय:- प्लास्टिक बंदी परिणामकारक होण्याच्या दृष्टीने व्यापक जनजागृती करणेबाबत.

संदर्भ:- शासन अधिसूचना क. प्लॉस्टिक २०१८/प्र. क. २४/तां. क./ दिनांक २३-०३-२०१८

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ च्या कलम २ व कलम ४ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाअंतर्गत महाराष्ट्र शासनातर्फे संपूर्ण राज्यात प्लास्टिक तसेच थर्माकॉल उत्पादनावर बंदी घालण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाद्वारे प्लॅस्टिक व थर्माकोल इत्यांदीपासून बनविलेल्या अविघटनशील वस्तूंचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक यांचे नियमन करण्याकरिता दिनांक २३ मार्च, २०१८ रोजी महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हातळणी, साठवणूक) अधिसूचना,२०१८ प्रसिध्द करण्यात आली आहे.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, सदरची प्लास्टीक बंदी परिणामकारक होण्याचे दृष्टीने व्यापक जनजागृती मोहिम राबविणे आवश्यक आहे. यासाठी महाविद्यालयीन/ संस्था/विभागांमार्फत विद्यार्थ्यांमध्ये आणि समाजामध्ये जनजागृती मोहिम यशस्वीरित्या राबविण्यात यावी. सदर जनजागृतीमध्ये पथनाटय, स्पर्धात्मक कार्यक्रम, निबंधस्पर्धा इ. चे आयोजन करावे. सदर अधिसुचना विद्यापीठाचे संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक तसेच मुंबई विद्यापीठाच्या विविध विभागांचे विभागप्रमूख आणि संचालक

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव (प्र)

दिनांक :- 18-5-2018